# प्रेसनोट

दि. ०६/०८/२०२५

सदर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय, पालघर यांच्या अधिनस्त असलेल्या जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, पालघर या कार्यालयाकडून जिल्ह्यातील पशुवैद्यकीय संस्थांना महिन्यातून एकदा द्रवनत्र रेतमात्रा इत्यादीचा पुरवठा वाहतूक करणेसाठी एक वर्षाचा भावबंद करार कालावधीसाठी खाजगी वाहतूक करणाऱ्या ठेकेदारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक पुरवठादार यांनी आपली दरपत्रके दि. १६/०८/२०२५ पर्यंत मोहोरबंद लिफाफ्यात सादर करावी. दरपत्रके दि.२०/०८/२०२५ रोजी नियुक्त समिती समोर उघडण्यात येतील व वाहतुकीचा कमीत कमी दर नमूद केलेल्या पुरवठादार यांना पुरवठा आदेश देण्यात येतील. अधिक माहितीसाठी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय, पालघर येथे संपर्क करावा. या बाबतचा तपशील कार्यालयाच्या तांत्रिक शाखेत उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

१. दरपत्रके सादर करताना अधिकृत लेटर हेड वरच सादर करावेत.

२. दरपत्रके सीलबंद लिफाफ्यात सादर करावे.

३. दरपत्रके ७ दिवसांच्या आत सादर करावे.

४. दर सर्व करासहित असावेत.

५. GST प्रमाणपत्र दरपत्रका सोबत सादर करावे.

६. वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे, आधार कार्ड, PAN कार्ड सोबत सादर करावे.

जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन
पालघर

## दरपत्रके सादर करण्याची पद्धत

**लिफाफा क्र.१ :-**

१. वाहनाचा प्रकार व क्षमता – सर्वसाधारण टेम्पो TATA-407 इतक्या क्षमतेचे किंवा त्या पुढील क्षमतेचे वाहन.

२. वाहन चालकाचा परवाना.

३. वाहन नोंदणी प्रमाणपत्र

४. वाहतूक ठेकेदाराची आधार कार्ड व PAN कार्डची छायांकित प्रत.

५. वाहनाच्या विमा पोलीसीचीछायांकित प्रत.

६. वाहनाचे फिटनेस प्रमाणपत्र

**लिफाफा क्र.२:-**

व्यापारी लिफाफा – सदर लिफाफ्यामध्ये ठेकेदाराने आपल्याकडील अपेक्षित दर नमूद करावे.

| अ.क्र. | वाहतुकीचा तपशील | परिमाण | दर(रु./पैसे) |
|---|---|---|---|
| १ | द्रवनत्र व विर्यमात्रा वाहतूक करणे | १ किमी | |

## सर्वसाधारण अटी व शर्थी :-

१. ठेकेदाराला ठरवून दिलेला दर हा दि. ०१/०९/२०२५ ते दि. ३१/०८/२०२६ पर्यंत द्रवनत्र/ वीर्यमात्रा वाहतुकीसाठी पुढील करार होईपर्यंत राहील.

२. सदर वाहतूक करताना कोणतेही प्रकारचे इतर शुल्क उदा. पथकर, टोल, इ. देय राहणार नाही.

३. सदरचा दर महाराष्ट्र राज्य व राज्याबाहेरील वाहतुकीसाठी राहील.

४. कराराच्या कालावधी दरम्यान इंधनाचे भाव वाढल्यास कुठल्याही प्रकारची भाववाढ मिळणार नाही याची नोंद घेऊन कालावधी पूर्ण होईपर्यंत द्रवनत्र व गोठीत रेतमात्रा वाहतूक करावी लागेल.

५. ठेकेदाराने ठरवून दिलेल्या ठिकाणावरून जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, पालघर या कार्यालयाच्या गोडाऊन मधून गरजेप्रमाणे रेतमात्रा, द्रवनत्र पात्रात द्रवनत्र घेऊन ते पालघर जिल्ह्यातील प्रत्येक वाहतूक मार्गावर सर्व कृत्रिम रेतन उपकेंद्राना दरमहा पुरवठा करायचा आहे. त्याप्रमाणे प्रत्येक फेरीच्या वेळी लेखी माहिती घेऊन जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र,पालघर येथून भरलेली द्रवनत्र पात्रे ताब्यात घेऊन त्याची पावती घेऊन ठेकेदाराने वाहनामार्फत नेणे, वाहनात चढविणे व उपकेंद्रावरील रिकामी पात्रे सुस्थितीत परत मूळ ठिकाणी आणणे ही सर्व कामे ठेकेदाराने बिनचूक करावयाची आहेत व त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील.

६. ठेकेदाराला कुठल्याही राष्ट्रीयकृत बँकेची रुपये १०,००० (रुपये दहा हजार मात्र) ची बँक ग्यारंटी जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, पालघर यांचे नावाने सुरक्षा अनामत ठेव म्हणून जमा करावी लागेल.

७. वाहतूक करताना शासनाचा एक प्रतिनिधी वाहनासोबत वाहतुकीसाठी राहील.

८. ठेकेदाराने करारबद्ध केलेले सदरचे वाहन हे TATA-407 इतक्या क्षमतेचे किंवा त्या पुढील क्षमतेचे वाहन पाहिजे असून त्याची क्षमता एकावेळी TA55 प्रकारची किमान ४० द्रवनत्रपात्रे मावतील अशी असावी.

९. ठेकेदाराने दरपत्रकासोबत सदर वाहनाची कागदपत्रे सादर करावीत.

१०. सदर वाहन बदली करावयाचे असल्यास ठेकेदाराने नवीन वाहनाची सर्व आवश्यक कागदपत्रे सादर करून शासनाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

११. ठेकेदार या करारनाम्यात ठरवून दिलेल्या वाहतूक दराने तसेच अटीप्रमाणे विर्यमात्रा, लस व इतर शासकीय साहित्याची आवश्यक ठिकाणी वाहतूक करावी लागेल.

१२. ठेकेदाराला महिन्यातून अंदाजे १५०० किमी पर्यंत वाहतूक करावी लागेल. यात शासकीय गरज व नियमाप्रमाणे अंतर कमी जास्त होईल.

१३. द्रवनत्र उत्पादक कंपनीत जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, पालघर येथील ८९ पशुवैद्यकीय संस्थांमध्ये रिकामी / भरलेली द्रवनत्र पात्रे चढ उतार करण्याची संपूर्ण कामे ठेकेदाराने करावयाची आहेत.

१४. ठेकेदाराला द्रवनत्र उत्पादक कंपनी कडून द्रवनत्र ताब्यात मिळेपर्यंत थांबावे लागेल. प्रसंगी तेथे वा पशुवैद्यकीय संस्थांना पुरवठा करतांना मुक्काम करावा लागेल. त्यासाठी कोणतेही ज्यादा शुल्क देय राहणार नाही.

१५. ठेकेदाराने वाहनास हूड लावणे आवश्यक असून तळाला रबर / फोम matting करणे आवश्यक राहील.

१६. ठेकेदाराने कोणत्याही बँकेकडून / अन्य संस्थेकडून कर्जावर वाहन घेतले असल्यास त्याचा हप्ता नियमित भरावा. सदरचे वाहन कर्जाचे हप्ते थकल्यावर वाहन जप्त झाल्यास त्याने पर्यायी व्यवस्था करून द्यावी लागेल. अगर त्याने तसे न केल्यास जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, पालघर / पशुधन विकास अधिकारी, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, पालघर यांनी इतर पर्यायी सेवा उपलब्ध करून घेतल्यास प्रचलित बाजार भावाने झालेल्या खर्चाची रक्कम ठेकेदारास द्यावी लागेल.

१७. वाहन शासकीय कामावर असताना त्या वाहनामध्ये इतर मालवाहून नेता येणार नाही.

१८. ठेकेदाराचे काम व्यवस्थित होत नसल्याचे अगर आदेशाचे पालन होत नसल्याचे आढळून आल्यास जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, पालघर यांना संबंधित ठेकेदाराची सेवा रद्द करण्याचा संपूर्ण हक्क राहील.

१९. द्रवनत्र वाहतूक करणे ही शासनाच्या अत्यावश्यक सेवेतील बाब असल्याने करारनाम्यातील मुदत संपल्यावर देखील नवीन वाहतूक करार मंजूर होईपर्यंत मंजूर झालेल्या दराने करारनाम्यातील अटी व शर्थींच्या अधीन राहून द्रवनत्र व इतर साहित्याची वाहतूक करावयाची आहे.

२०. वाहतुकीसाठी अग्रीमधन दिले जाणार नाही. इंधनाची व्यवस्था ठेकेदाराने स्वतः करावयाची आहे.

२१. नवीन आर्थिक वर्षात वरिष्ठ कार्यालयाकडून वित्तीय तरतूद मिळण्यास विलंब लागण्याची शक्यताना कारता येत नाही.

२२. द्रवनत्र ताब्यात मिळाल्यापासून रिकामी द्रवनत्र पात्रे झाकणास जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, पालघर येथील अधिकाऱ्याच्या ताब्यात परत देईपर्यंत जबाबदारी ठेकेदाराची राहील.

२३. द्रवनत्र पात्रांची योग्य प्रकारे हाताळणी करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. वाहतूक करताना जर एखादा अपघात झाल्यास द्रवनत्रपात्रांच्या होणाऱ्या नुकसानीस ठेकेदार जबाबदार राहील.

२४. वाहतूक करताना वाहनाच्या झालेल्या नुकसानीस, वाहकास, वाहनचालक, शासनाच्या प्रतिनिधीस इजा झाल्यास त्यांची जबाबदारी ठेकेदारावर राहील.

२५. वाहतुकीच्या नियोजित दौऱ्यानुसार सुस्थितीतील वाहन, वाहन चालक, वाहक, इ. सेवावेळेवर उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ठेकेदारावर राहील.

२६. शासकीय वाहतुकीत अडथळा निर्माण होऊ नये म्हणून ठेकेदाराने आपले वाहन कायम सुस्थितीत ठेवावे. वाहनाच्या दुरुस्तीचा सर्व खर्च ठेकेदारास स्वतः करावा लागेल. वाहनासंबंधीत सर्व मूळ कागदपत्र अद्ययावत ठेवण्याची जबाबदारी ठेकेदारावर राहील.

२७. ठेकेदाराला ठरवून दिलेला दौरा कार्यक्रम पूर्ण करावा लागेल. अर्धवट दौरा केल्यास त्या दौऱ्याचे देयक मंजूर केले जाणार नाही.

२८. वाहतूक करताना सर्व कायदेशीर बाबी पाळण्याची जबाबदारी ठेकेदारावर राहील.

२९. ठेकेदाराकडून त्याच्या बिलामधून प्रचलित दराने आयकर व इतर कर वसूल केला जाईल.

३०. सध्याच्या मार्गात तसेच मुक्कामात शासकीय काटकसरीच्या धोरणाप्रमाणे बदल झाल्यास त्याप्रमाणे ठेकेदारास अमलबजावणी करावी लागेल.

३१. एकदा ठरवून दिलेल्या वाहतुकीच्या दरात कोणत्याही कारणाने वाढ करण्यात येणार नाही.

३२. ठेकेदाराने वाहनाचे अंतर दर्शविणारे मीटर सुस्थितीत राहील, दौरा सुरु करतांना व संपल्यावर दोन्ही वेळेस अचूक किमी रिडींग शासनाच्या प्रतिनिधी समोर केले जाईल, दौऱ्याचे अचूक देयक सादर केले जाईल याची दक्षता घ्यावी. किलोमीटर दर्शविणारे मीटर बंद पडल्यास सरासरी नुसार देयक अदा करण्यात येईल.

३३. करारनाम्यातील अटी, शर्थी व कामाबाबत काही मतभेद झाल्यास जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त पालघर यांचा निर्णय अंतिम राहील व तो निर्णय ठेकेदारावर बंधनकारक राहील.

३४. उपरोक्त अटी व शर्थी करारनामा लिहून देणार व घेणार यांना मान्य आहेत.

जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन
पालघर